**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २९९ प्रमाणे आरोपींच्या अनुपस्थीतीत पुरावा**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१**

मी देवा शपथ खरे सांगतो की:

माझे नावः संतोष सोनु खेरटकर

वयः ५४ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणार –पिंगळसई, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जे.एस. कुलकर्णी यांच्यामार्फत :**

०१. दिनांक २३/०६//२०१४ रोजी मी व विजय खेरटकर धाटावकडुन येत असताना ब्रेंडा कॉम्प्लेक्स समोर नदीकडे जाणारा बायपास रस्त्यावर पोलीस होते. पोलीसांनी मला आवाज देवुन बोलावले. तेथे संकेत मुटके हजर होता. त्याठिकाणी मारहाणीच्या घटनेत पडलेले बियरच्या बॉटलचे तुकडे होते. ते घटनास्थळ आम्हाला संकेत मुटके यांनी आम्हाला दाखवले. घटनास्थळ रस्त्याच्या बाजुला एका हॉटेल शेजारी होते. पोलीसांनी आमच्या समोर बॉटलचे तुकडे जमा केले. बॅगमध्ये घेवुन पॅक केले व पोलीस ठाण्यात आणुन त्यावर माझी सही घेतली. घटनास्थळी पोलीसांनी माझ्यासमोर सर्व लिहुन घेतले व त्यावर मी सही केली. आता मला दाखवलेल्या पंचनाम्यावर क्रमांक २ ची सही माझी असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. **पंचनाम्यास नि.क्र.३८** देण्यात येत आहे. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येणार नाहीत कारण बराच कालावधी लोटला आहे. आता मला मु.र.नं.१३/२०१७ वरील **दोन काचेचे तुकडे** दाखवले. सदर तुकडे तेच आहेत. त्या तुकडयांना एकत्रीतपणे **आर्टीकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.04.28 17:53:16 +0530

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)

दि. २८.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.